राष्ट्रीय खादय तेल अभियानातंर्गत (तेलबिया) सन २०२६-२७ करिता तिन्ही प्रवर्गासाठी (सर्वसाधारण, अनु.जाती, अनु.जमाती) पहिल्या हप्त्याचा केंद्र हिस्सा (Mother Sanction) व समरुप राज्य हिस्सा वितरित करणेबाबत.

**महाराष्ट्र शासन**

**कृषी, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग**

**शासन निर्णय क्रमांक : राखातेअ-२०२६/प्र.क्र.४३/४-अे (ई-१६३४०६६)**

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय विस्तार, मुंबई - ४०० ०३२
दिनांक : २१ मे, २०२६.

**वाचा:-**

१. कृषि व पदुम विभागाचा शासन निर्णय क्र.संकीर्ण-२०१७/प्र.क्र.३१/१७-अे, दि.१९/०४/२०१७ .
२. कृषि व पदुम विभागाचा शासन निर्णय क्र.संकीर्ण-२०१७/प्र.क्र.३१/१७-अे, दि.१२/०९/२०१७.
३. कृषि व पदुम विभागाचा शासन निर्णय क्र. संकीर्ण-०९१९/प्र.क्र.२२१/१४-अे, दि.०४/११/२०२०.
४. शासन पत्र No.CSS-२०२६/C.R.१९/२-A, दि.११/०३/२०२६.
५. केंद्र शासनाचे पत्र F.No.०३/१४/२०२६-KY (E-१८६५५७), दि.२२/०४/२०२६.
६. केंद्र शासनाचे पत्र F.No.(MH-१२, MH-५९० ), दि.२३/०४/२०२६.
७. कृषि व पदुम विभागाचा शासन निर्णय क्र. राखातेअ-२०२६/प्र.क्र.४३/४-अे- (ई-१६३४०६६), दि.११/०५/२०२६.
८. वित्त विभागाचे शासन परिपत्रक क्र.अर्थसं-२०२६/प्र.क्र.४०/अर्थ-३,दि.०७/०५/२०२६.
९. आदिवासी विकास विभागाचे शासन परिपत्रक क्र.बीयुडी-२०२६/प्र.क्र.६१/कार्यासन-६, दि.१३/०५/२०२६.
१०. सामाजिक न्याय विभागाचे शासन परिपत्रक क्र. बीयुडी-२०२५/प्र.क्र.१०५/ अर्थसंकल्प, दि.१९/०५/२०२६.
११. कृषि आयुक्तालयाचे जा.क्र./विप्र-२/राखातेअ २०२६-२७/निधी मागणी/प्र.क्र.०५/र-२४३, र-२४४/२०२६. दि.१२/०५/२०२६

**प्रस्तावना :-**

राष्ट्रीय खाद्यतेल अभियान-तेलबिया (NMEO-OS) या अभियानाचा मुख्य उद्देश देशातील खाद्यतेलाच्या वाढत्या मागणीची पूर्तता देशांतर्गत उत्पादनातून करणे व आयातीवरील अवलंबित्व कमी करणे हा आहे. भारतात खाद्यतेलाची मोठ्या प्रमाणावर आयात केली जाते. त्यामुळे तेलबिया पिकांचे उत्पादन, उत्पादकता आणि प्रक्रिया क्षमता वाढविण्यासाठी केंद्र शासनामार्फत हे अभियान राबविण्यात येत आहे. या अभियानांतर्गत सोयाबीन, सूर्यफूल, भुईमूग, तीळ, मोहरी, करडई इत्यादी तेलबिया पिकांच्या उत्पादनवाढीस विशेष प्रोत्साहन दिले जाते.

सन २०२६-२७ साठी राष्ट्रीय खाद्य तेल अभियान-तेलबिया अंतर्गत रु. २०१७४.९९३८६ लाख (केंद्र हिस्सा रु. १२३१३.०० लाख व राज्य हिस्सा रु. ७८६१.९९३८६ लाख) कार्यक्रमास वरील वाचा क्र.४ अन्वये राज्यस्तरीय मान्यता समितीने दि. १० मार्च, २०२६ च्या बैठकीत मान्यता प्रदान केली आहे. केंद्र शासनाने वाचा क्र.५ दि.२२ एप्रिल २०२६ अन्वये, सदर योजनेसाठी रु. २००७३.५३ लाख (केंद्र हिस्सा रु. १२१८५.०३ लाख व राज्य हिस्सा रु. ७८८८.५० लाख) रकमेच्या वार्षिक कृती आराखड्यास, बाबनिहाय भौतिक आर्थिक कार्यक्रमास मान्यता दिलेली आहे.

सन २०२६-२७ साठी राष्ट्रीय खादय तेल अभियान (तेलबिया) अंतर्गत केंद्र शासनाने वाचा क्र.६, दि.२३/४/२०२६ अन्वये, MH-१२ या SLS अंतर्गत तिन्ही प्रवर्गांकरिता (सर्वसाधारण, अनु.जाती, अनु.जमाती) पहिल्या हप्त्यापोटी, केंद्र हिश्श्याचा एकूण रु.५२६६.१६०० लाख निधी वितरीत केलेला आहे. तसेच, MH-५९० या SLS अंतर्गत, केंद्र हिस्सा रु १५६.७८ लाख निधी वितरित केला आहे.

सन २०२६-२७ साठी राष्ट्रीय खादयतेल अभियान-तेलबिया करीता, केंद्र शासनाने पहिल्या Mother Sanction द्वारे अनुसूचित जमाती प्रवर्गासाठी उपलब्ध अर्थसंकल्पीय तरतूदीपेक्षा (रु.४५०.०० लाख) अधिकचा निधी वितरीत (रु.४९५.०२ लाख) केलेला आहे.

सदर योजनेअंतर्गत, MH-१२ या SLS साठी केंद्र शासनाने वितरीत केलेल्या रु.५२६६.१६०० लाख तरतूदीपैकी उपलब्ध अर्थसंकल्पिय तरतूदीच्या मर्यादेत रु.५२२१.१४०० लाख केंद्र हिस्सा व त्यास समरुप राज्य हिस्सा रु. ३४८०.७६००१ लाख असा एकुण रु. ८७०१.९०००१ लाख (अक्षरी रु.सत्त्याऐंशी कोटी, एक लाख, नव्वद हजार एक रुपये फक्त ), तसेच, MH-५९० या SLS अंतर्गत, केंद्र हिस्सा (१०० टक्के-सर्वसाधारण प्रवर्ग) रु १५६.७८ लाख निधीस लेखाशीर्षनिहाय वित्तीय मान्यता प्रदान करून सदर निधी बिम्स प्रणालीवर वितरीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. याबाबत शासन पुढीलप्रमाणे निर्णय घेत आहे.

**शासन निर्णय:-**

सन २०२६-२७ साठी राष्ट्रीय खादय तेल अभियानातंर्गत (तेलबिया), MH-१२ या SLS अंतर्गत तिन्ही प्रवर्गांसाठी एकूण रु. ८७०१.९०००१ लाख (अक्षरी रु.सत्त्याऐंशी कोटी, एक लाख, नव्वद हजार एक रुपये फक्त) (केंद्र हिस्सा रु. ५२२१.१४००० लाख व राज्य हिस्सा रु. ३४८०.७६००१ लाख), तसेच, MH-५९० या SLS अंतर्गत, केंद्र हिस्सा (१०० टक्के-सर्वसाधारण प्रवर्ग) रु.१५६.७८ लाख (एक कोटी, छप्पन्न लाख, अठठ्याहत्तर हजार रुपये फक्त) निधीस वित्तीय मान्यता देण्यात येत आहे.

२. सदर अभियानातंर्गत अ) MH-१२ या SLS अंतर्गत तिन्ही प्रवर्गांकरिता (सर्वसाधारण, अनु.जाती, अनु.जमाती) केंद्र व राज्य हिश्श्याचे प्रवर्गनिहाय निधी वितरण पुढीलप्रमाणे :-

(रू.लाखात)

| अ. क्र. | प्रवर्ग | राष्ट्रीय खाद्यतेल अभियान- तेलबिया (MH-५९०) | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | लेखा शीर्ष | केंद्र हिस्सा | लेखा शीर्ष | समरूप राज्य हिस्सा | एकुण |
| १ | **सर्वसाधारण** | २४०१ २४९८ | ४१४९.७३००० | २४०१ १५३५ | २७६६.४८६६७ | ६९१६.२१६६७ |
| २ | **अनु. जाती** | २४०१ बी ४२८ | ६२१.४१००० | २४०१ बी ४३७ | ४१४.२७३३४ | १०३५.६८३३४ |
| ३ | **अनु. जमाती** | २४०१ ए ४८६ | ४५०.००००० | २४०१ ए ४७७ | ३००.००००० | ७५०.००००० |
| **एकुण** | | -- | **५२२१.१४०००** | -- | **३४८०.७६००१** | **८७०१.९०००१** |

ब) MH-५९० या SLS अंतर्गत, केंद्र हिश्श्याचे वितरण पुढीलप्रमाणे:-

| अ.क्र. | राज्य संलग्नित योजना (SLS) नाव | लेखाशीर्ष | केंद्र हिस्सा |
|---|---|---|---|
| १ | MH-590 : Purchase of Breeder Seed (NMEO) (१००% केंद्र हिस्सा) (सर्वसाधारण प्रवर्ग) | २४०१ बी ६४२ | १५६७८. |

३.	सदर अभियानातंर्गत **अ)** MH-१२ या SLS अंतर्गत तिन्ही प्रवर्गाकरिता (सर्वसाधारण, अनु.जाती, अनु.जमाती) उपलब्ध करुन देण्यात आलेला निधी खालील लेखाशिर्षातर्गत सन २०२६-२७ करिता अर्थसंकल्पित करण्यात आलेल्या तरतुदीतून SNA-SPARSH खात्यातून खर्ची टाकावा.

| प्रवर्ग | केंद्र हिस्सा | राज्य हिस्सा |
|---|---|---|
| **सर्वसाधारण** | मागणी क्रमांक डी-३<br>२४०१- पीकसंवर्धन<br>११४, तेलबिया<br>(००)(०६)कृषि उन्नती योजना-राष्ट्रीय तेलबिया व तेलताड अभियान<br>लघुअभियान-१ (तेलबिया)<br>(कें.पु.यो)(केंद्र हिस्सा ६०%)<br>(२४०१ २४९८), ३३-अर्थसहाय्य | मागणी क्रमांक डी-३<br>२४०१- पीकसंवर्धन<br>११४, तेलबिया<br>(००)(०१)कृषि उन्नती योजना-राष्ट्रीय तेलबिया व तेलताड अभियान<br>लघुअभियान-१ (तेलबिया) (जिल्हा परिषद) (राज्य हिस्सा ४०%)<br>(२४०१ १५३५), ३३-अर्थसहाय्य |
| **अनु.जाती** | मागणी क्रमांक एन-३<br>२४०१- पीकसंवर्धन<br>(७८९)अनुसूचित जाती उपाययोजना<br>(०१)(२८)कृषि उन्नती योजना-<br>राष्ट्रीय अन्न सुरक्षा अभियान-गळीतधान्य आणि तेलताड (केंद्र हिस्सा ६०%)<br>(२४०१ B४२८), ३३-अर्थसहाय्य | मागणी क्रमांक एन-३<br>२४०१- पीकसंवर्धन<br>(७८९) अनुसूचित जाती उपाययोजना<br>(०१)(२८)कृषि उन्नती योजना-<br>राष्ट्रीय अन्न सुरक्षा अभियान-गळीतधान्य आणि तेलताड (राज्य हिस्सा ४०%)<br>(२४०१ B४३७), ३३-अर्थसहाय्य |
| **अनु.जमाती** | मागणी क्रमांक टी-५<br>२४०१- पीकसंवर्धन<br>७९६, जनजाती क्षेत्र उपाययोजना (०१)(१४)कृषि उन्नती योजना-राष्ट्रीय तेलबिया व तेलताड अभियान<br>लघुअभियान-१ (तेलबिया)<br>(कें.पु.यो) (केंद्र हिस्सा ६०%)<br>(२४०१ A४८६), ३३-अर्थसहाय्य | मागणी क्रमांक टी-५<br>२४०१- पीकसंवर्धन<br>७९६, जनजाती क्षेत्र उपाययोजना (०१)(१४)कृषि उन्नती योजना-राष्ट्रीय तेलबिया व तेलताड अभियान<br>लघुअभियान-१ (तेलबिया)<br>(कें.पु.यो) (राज्य हिस्सा ४०%)<br>(२४०१ A४७७), ३३-अर्थसहाय्य |

**ब)** MH-५९० या SLS अंतर्गत उपलब्ध करुन देण्यात आलेला निधी खालील लेखाशिर्षांतर्गत सन २०२६-२७ करिता अर्थसंकल्पित करण्यात आलेल्या तरतुदीतून SNA-SPARSH खात्यातून खर्ची टाकावा.

| अ. क्र. | योजनेचे (SLS) नाव | लेखाशीर्ष |
|---|---|---|
| १ | MH-५९० :<br>मुलभूत बियाणे खरेदी<br>(राष्ट्रीय खादय तेल अभियान)<br>(१००% केंद्र हिस्सा) | मागणी क्रमांक डी-३<br>२४०१- पीकसंवर्धन<br>११४, तेलबियांचा विकास,<br>(००) (१७) केंद्र पुरस्कृत कृषी उन्नती योजना-राष्ट्रीय खाद्य तेल अभियान अंतर्गत मुलभूत बियाणे खरेदी (१००% केंद्र हिस्सा), ३३, अर्थसहाय्य २४०१ बी ६४२ |

४. सन २०२६-२७ मध्ये राज्यात सदर अभियानाची अमंलबजावणी व सनियंत्रण करण्याच्या दृष्टीने निधी आहरण व वितरण करणेसाठी, पुढीलप्रमाणे नियंत्रण, तसेच, आहरण व संवितरण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहेत.

| स्तर | नियंत्रण अधिकारी | आहरण व संवितरण आधिकारी |
|---|---|---|
| आयुक्तालय स्तर | आयुक्त (कृषि),<br>कृषी आयुक्तालय, पुणे | सहाय्यक संचालक (लेखा-१) कृषी आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य पुणे. |

५. सदर योजनेची अंमलबजावणी करताना उपरोक्त वाचा क्र.७, दि.११/०५/२०२६ च्या शासन निर्णयात नमूद केलेल्या अटी व शर्तीचे पालन करुन निधी वितरणाची कार्यवाही करण्यात यावी.

६. या शासन निर्णयान्वये उपलब्ध करुन देण्यात आलेल्या निधीचा तात्काळ विनियोग करण्यात यावा. तसेच, निधी विनियोगाच्या अनुषंगाने संचालक (विस्तार व प्रशिक्षण) यांनी वेळोवेळी उपयोगिता प्रमाणपत्र शासनास सादर करावे.

७. हा शासन निर्णय, वित्त विभागाचे शासन परिपत्रक क्र.अर्थसं-२०२६/प्र.क्र.४०/अर्थ-३,दि.०७/०५/२०२६ आदिवासी विकास विभागाचे शासन परिपत्रक क्र. बीयुडी-२०२६/प्र.क्र.६१/ कार्यासन-६,दि.१३/०५/२०२६ सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग शासन परिपत्रक बीयुडी-२०२५/प्र.क्र.१०५/अर्थसंकल्प, दि.१९/०५/२०२६ नुसार विहीत केलेल्या अटींची पूर्तता होत असल्याने, तसेच, सदर परिपत्रकानुसार या विभागास प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

८. सदर अभियानांतर्गत केंद्र शासनाच्या वेळोवेळी प्राप्त सूचनांचे पालन करणे बंधनकारक असेल.

९. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२६०५२११८४३५०७००१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

**महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,**

RUCHITA RANJAN PIMPLE

Digitally signed by RUCHITA RANJAN PIMPLE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=AGRICULTURE AND ADF DEPARTMENT,
2.5.4.20=4D2E14E1B5B622285A319D549438716BC45686280AAC03BEA60829E714C19298, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=7E83BB07DDF0C67032F513E6336E3EE49F53DC047998C7012096DD9C8059D5FE, cn=RUCHITA RANJAN PIMPLE
Date: 2026.05.21 18:44:58 +05'30'

**(रुचिता पिंपळे)**
**कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१) मा.विरोधी पक्ष नेता, विधानसभा, विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
२) मा.विरोधी पक्ष नेता, विधानपरिषद, विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
३) मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई.
४) अपर मुख्य सचिव (वित्त), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
५) सचिव (नियोजन), नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई.
६) सचिव (कृषि), कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई.
७) मा.मंत्री(कृषि) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.

८) मा.राज्यमंत्री (कृषि) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
९) आयुक्त (कृषि), कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.
१०) व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य बियाणे महामंडळ, अकोला.
११) महालेखाकार ( स्थानिक निकाय लेखा परीक्षा व लेखा), मुंबई
१२) संचालक (विस्तार व प्रशिक्षण), कृषि आयुक्तालय, साखर संकुल, शिवाजीनगर, पुणे.
१३) सर्व विभागीय कृषि सहसंचालक
१४) सर्व जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी
१५) सर्व कृषी विदयापीठे ( पंजाबराव देशमुख कृषी विदयापीठ, अकोला, डॉ.बाळासाहेब सांवत कृषि विदयापीठ दापोली, वसंतराव नाईक कृषी विदयापीठ, परभणी व महात्मा फुले कृषी विदयापीठ राहूरी )
१६) सर्व कृषि विज्ञान केंद्रे
१७) महालेखापाल (लेखा परीक्षा), महाराष्ट्र १/२, मुंबई/नागपूर.
१८) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र १/२, मुंबई/नागपूर.
१९) सर्व जिल्हा कोषागार अधिकारी, महाराष्ट्र राज्य
२०) सर्व तालुका कृषि अधिकारी.
२१) सहायक संचालक (लेखा-१), कृषि आयुक्तालय, पुणे
२२) वित्त विभाग (कार्या. व्यय-१ / अर्थसंकल्प - १३), मंत्रालय, मुंबई
२३) निवड नस्ती.